सप्टेंबर २००२

# नागरी सहकारी पतसंस्थांची कर्जवसुली

नागरी सहकारी पतसंस्थांची वाढती थकबाकी ही सध्याची चिंतेची बाब होऊन बसली आहे. पतसंस्थांचे कर्जदार सभासद कर्जाची परतफेड नियमीत करीत असले तरीही काही अडचणी वा परिहार्य कारणामुळे कर्जाची थकबाकी करणाऱ्यांची संख्या हळूहळू वाढत आहे. ही बाब पतसंस्थांच्या दृष्टीने हिताची नाही.

पतसंस्थांनी सभासदांना कर्ज मंजूर केल्यानंतर व कर्ज वितरणाच्या अगोदर सर्व कागदपत्रांची पुर्तता करून घेतल्यानंतरच कर्ज वितरण करणे आणि कर्जाचे हफ्ते नियमीत भरणेबाबत कर्जदारांना व जामिनदारांना समक्ष सुचना देणे अतिशय गरजेचे आहे. कर्जाचा दरमहा किती हफ्ता भरावा, कोणत्या तारखेस भरावा याचीही माहिती कर्जदारांना व जामिनदारांना देणे आवश्यक आहे. तसेच कर्जदारांच्या कर्जखात्याकडे सातत्याने लक्ष देणे आवश्यक आहे. एखाद्या महिन्याचा जरी हफ्ता भरणे चुकल्यास लगेच कर्जदारांकडे संपर्क साधून हफ्ता वसुल करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. कर्जदाराचे सतत तीन महिने थकबाकी झाल्यास त्यांना संस्थेने स्मरणपत्र पाठवूनही हफ्ते न भरल्यास अशा कर्जदारांकडे कर्जाचे हफ्ते वसुलीसाठी कायदेशिर कारवाई करणे आवश्यक आहे. व कायदेशीर कारवाई करणेपुर्वी संबंधित कर्जदारांना थकबाकी भरणेबाबत अंतिम नोटीस देण्यात यावी. व त्याची एक प्रत जामिनदारांना द्यावी. कर्जदार व जामिनदार यांनी नोटीस देऊनही थकबाकी न भरल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ९१ खाली सहकार न्यायालय वा कलम १०१ खाली उपनिबंधक सहकारी संस्था वा सक्षम अधिकाऱ्याकडे थकबाकी वसुलीसाठी दावा दाखल करण्याबाबत संस्थेच्या संचालक मंडळाने त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे.

कलम ९१ वा १०१ अन्वये वसुली दाखला मिळाल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीसाठी तो वसुली दाखला ज्यांना महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम १५६ चे अधिकार आहे, त्यांच्याकडे त्वरीत देणे आवश्यक आहे. व असा अधिकारी वसुली दाखल्यानुसार मुद्दल, व्याज, वसुली खर्च या रकमा वसुल करून देतो.

प्रामुख्याने वसुलीची समस्या नागरी सहकारी पतसंस्थांना जास्त जाणवत असल्याचे दिसत आहे. त्यांना वसुली दाखले मिळविणेसाठी येत असलेल्या अडचणी, वसुली दाखले मिळाल्यानंतर सहकार खात्याकडून वसुली अधिकारी मिळण्यासाठी येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन मुंबई शहरातील नागरी सहकारी पतसंस्था आणि इतर सहकारी संस्थांच्या कर्जवसुलीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी पतसंस्था परिवार तर्फे पश्चिम उपनगरातील सहकारी संस्थांसाठी नुकतेच एक मार्गदर्शन सत्र आयोजित केलेले होते. त्यानंतर पुर्व उपनगरातील व मुंबई विभागातील सहकारी संस्थांकरीता त्या धर्तीवर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येत असून त्यामध्ये तज्ञ व्यक्ति मार्गदर्शन

करणार आहेत. या मार्गदर्शन सत्राचा जास्तीत जास्त फायदा सहकारी संस्थांनी घ्यावा. तसेच मुंबै बँकेने शासनाकडून उपनिबंधक दर्जाचा एक अधिकारी परसेवेवर घेतला असून त्यांच्याकडे बँकेचे सभासद असलेल्या सर्व संस्थांना त्यांची थकबाकी वसुलीसाठी कलम १०१ अन्वये दावे दाखल करून वसुली दाखले मिळविता येतात. तसेच मिळालेल्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्यासाठी बँकेतर्फे विशेष वसुली अधिकारीही संस्थांना देण्यात येत आहे. याचा जास्तीत जास्त फायदा सहकारी संस्थांनी घेऊन आपल्या कर्जाची थकबाकी वसुल करून थकबाकी कमी करण्याचा प्रयत्न करावा असे मी आवाहन करतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**